# डॉ श्रुतिका कांकरिया

रेटीना स्पेशालिस्ट

डॉ. प्रकाश व डॉ. सुधा कांकरिया यांनी साई सूर्य नेत्रसेवाचा पाया पक्का केला. यशाची अनेक मजले उभे केले. आणि त्यावर आता सोनेरी कळस चढविण्याचे कार्य डॉ. वर्धमान व डॉ. सौ. श्रुतिका कांकरिया करीत आहेत. डॉ. श्रुतिका या साई सूर्य नेत्रसेवा येथे डोळयाचा पडदा(Retina specialist) व मोतिबिंदू तज्ञ आहेत. डॉ. श्रुतिका यांनी मेडीकल प्रवेश परिक्षेत नाशिक विभागात गुणवत्ता प्राप्त करून ख्यातीकिर्त जी एस मेडीकल कॉलेज मुंबई (के ई एम हॉस्पीटल, मुंबई) येथून मेडीकलचे शिक्षण पूर्ण केले.

डॉ. श्रुतिका कांकरिया यांनी चेन्नई येथील अतिशय ख्यातनाम  शंकर नेत्रालय येथे नेत्रशास्त्राची पदवी संपादन केली. या दरम्यान त्यांनी अनेक राष्ट्रीय अंतरराष्ट्रीय स्पर्धा परीक्षेत बक्षिसे मिळवीली. त्यामध्ये उल्लेखनीय म्हणजे भारतीय नेत्रतज्ञ संघटना(All India Ophthalmic Society) यांच्या वतीने घेण्यात आलेल्या कॉनफरन्समध्ये राष्ट्रीय स्पर्धेत पहिला क्रमांक मिळविला. त्यानंतर (Allergan Academic Achivers) या राष्ट्रीय स्पर्धेत संपूर्ण देशभरातून १७०० नेत्रतज्ञांनी भाग घेतला होता. हैद्राबाद येथे झालेल्या अंतिम फेरीमध्ये डॉ. श्रुतिका कांकरिया यांनी दुसरा क्रमांक मिळवला. त्याना अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय नेत्रतज्ञांच्या वतीने "Allergan Academic Achivers"  या पुरसकाराने गौरविण्यात आले.पुरस्कार स्वरूपात त्यांना चीन येथे एशीया पॅसिफिक ऑफथलमिक असो.च्या वतीने होणाऱ्या कॉनफरन्समध्ये आमंत्रित करण्यात आले.

एल व्ही प्रसाद आय हॉस्पीटल आयोजित आयपेप (Eye pep) या स्पर्धेमध्ये पहिला क्रमांक मिळविला. त्याचबरोबर अनेक आंतरराष्ट्रीय परिक्षेत उत्तीर्ण होऊन U.K. (United Kingdom) ची Fellow of International Council of Ophthalmology (FICO) व Glasgow ची FRCS डिग्री प्राप्त केली. आत्तापर्यंत डॉ. श्रुतिका यांनी अनेक राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये शोधनिबंध सादर केले.

त्यांनी रेटीनाचे उच्च शिक्षण चेन्नई येथील प्रख्यात शंकर नेत्रालय येथून पूर्ण केले. पडदयाच्या विकारतील डायबेटीक रेटीनोपेथी म्हणजेच डायबेटीस मुळे होणारे पडदयाचे विकार या वर संशोधन करून विशेष कौशल्य संपादन केले आहे. अहमदनगरमध्ये  साई सूर्य नेत्रसेवा येथे पहिल्यांदाच OCT मशीन द्वारे पडदयाची तपासणी सुरू झाली. यानंतर त्यांनी अमेरीकेतील सर्वात ख्यातनाम बास्कम पाल्मर आय हॉस्पीटल येथे डॉ. हॅरी फ्लींग यांच्याकडून प्रशिक्षण घेतले. अशी संधी भारतातील मोजक्याच नेत्रतज्ञांना मिळाली आहे.

मुंबई ऑफथलमिक सोसा., पुणे ऑफथलमिक सोसा., महाराष्ट्र ऑफथलमिक सोसा. ऑल इंडिया ऑफथलमिक सोसा., अमेरिकन ऑफथलमिक सोसा. यांच्या त्या सदस्य आहेत.

पडदयाच्या विकारांविषयी जनजागृती करून आपली नेत्रसेवा गरीब व गरजू रूग्णांपर्यंत पोहचविण्याचा त्यांचा मानस आहे.

---

Dr Shrutika Vardhaman Kankaria
Email Id : shrutseye@yahoo.com
www.asianeyehospital.com